Power of Knowledge Peer Review Journal, Volume I, Issue:II July to Sept. 2021 ISSN 2320-4494 Impact factor 3.7286

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Editor
Professor, Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •
Professor, Dr. Sadashiv H. Sarkate
Editor : POWER OF KNOWLEDGE
Head of Dept. Marathi
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-
Annual Subscription: Rs. 1000/-

Scanned by CamScanner

RNI No MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*July to Sept. 2021*

Editorial Officer

**Kranti Publication**

Georai Dist Beed

Beed -431 127

Contact 7875827115

E-mail : Sarkarelata@gmail.com

**Published By :**

Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr B.A.M.U Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex Director, BCUD
Dr B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq Georai Dist Beed

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur.Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub.Administration,
Kalikadevi College, Shirur (K.), Dist.Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya,
Deulgaonraja, Buldana

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

Scanned by CamScanner

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | A Flak Study of Chetan Bhagat's 2 States: - The Story of My Marrige In Indian Ambience | Uday Madhukarrao Kharat | 1-3 |
| 2 | Chakmaza glimpse of miserable life | Abhijit Bag | 4-6 |
| 3 | Online Education in pandemic of COVID-19 | Dr. Pramodini Nawale (Kadam) | 7-11 |
| 4 | Awareness Level of Agripreneurs and Factors influencing on Agripreneurship Development in North Karnataka | Devaraju | 12-17 |
| 5 | A geographical study of the problem of population growth in India | Dr.Ghodke.J.V. | 18-22 |
| 6 | Competency-Based Education In Teaching And Learning -A Bird Eye View | Mohan V.T.<br>Dr. B.P. Shivalingappa | 23-29 |
| 7 | White Women Missionaries in Colonial India (1860-1920) | Moumita Datta | 30-36 |
| 8 | Role Of Digitization And E-Commerce On Indian Economic Growth | Dr. Ashwini Sunil Potphode | 37-40 |
| 9 | Resource Management And Sustainable Development | Dr. Meena Sachin Gosewade | 41-44 |
| 10 | Competency Based Education: Best Practices and Implementation Strategies for Institutions of Higher Education | Mohamad Mustafa Mujawar<br>Dr.Shivalingappa B.P | 45-48 |
| 11 | Molesworth, The Father of the Marathi -English Dictionary | Natkar Sangita Sheshrao | 49-51 |
| 12 | A Study Of Working Capital Management Of Bajaj Healthcare Ltd. | Dr. Vijay Narayan Gaikwad | 52-57 |
| 13 | दत्ता भगत यांच्या एकांकिकेतील आशयाविष्कार | प्रा.डॉ. सुशील मेश्राम | 58-63 |
| 14 | शरणकुमार लिंबाळे यांच्या कथांमधील दाहकता | डॉ.धनपाल कांबळे | 64-67 |
| 15 | 'कवयित्री उषाकिरण आत्राम यांच्या कवितेतील वेदना व विद्रोह' | डॉ. राजकुमार रघुनाथ मुसने<br>श्री. ज्ञानेश्वर चंद्रभान सानप | 68-74 |
| 16 | समर्थ रामदासांचे वाङ्मयीन कार्य | प्रा. डॉ. गौतम ढवळे | 75-76 |
| 17 | लीळाचरित्रात श्रीचक्रधरस्वामींच्या श्रीमुखी आलेली संस्कृत सूत्र | प्रा.डॉ.सौ.कविता सुनिल होले<br>प्रा.गोविंद केरबा शिंदे | 77-83 |
| 18 | रथ मधील ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रतिबिंब | प्रा.डॉ.जयराम खाडे | 84-90 |
| 19 | आदिवासी लोकगीतांमधील स्त्रीदर्शन | डॉ.राहुल भालेराव पाटील | 91-96 |
| 20 | आदिवासींचा उपेक्षित इतिहास | डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे | 97-100 |
| 21 | मराठी संत कवयित्रींच्या साहित्यातील स्त्री विचार | डॉ.जया कदम | 101-106 |
| 22 | २००० नंतरच्या ग्रामीण कथांमधील वास्तव आणि जाणिवा | श्री.सोमनाथ दत्तात्रय फुगट<br>प्रा.डॉ.सुरेश व्ही. जाधव | 107-112 |



Scanned by CamScanner

Power of Knowledge Peer Review Journal, Volume I, Issue:II July to Sept. 2021 ISSN 2320-4494 Impact factor 3.7286

# २००० नंतरच्या ग्रामीण कथांमधील वास्तव आणि जाणिवा

**श्री.सोमनाथ दत्तात्रय फुगट**
के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

**प्रा.डॉ.सुरेश व्ही. जाधव**
के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

**प्रस्तावना :**

साहित्याला किंवा साहित्य प्रकारांना वेळोवेळी अनेक विशेषणे कायमची किंवा त्या त्या वेळेपुरते लावून त्यांचे वर्णन केले जाते. 'ग्रामीण साहित्य' ही संज्ञा रूढ होऊन कितीतरी दशकं लोटली. ग्रामीण या विशेषणाखाली आता मोठ्या प्रमाणात साहित्य निर्माण होऊ लागले आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे नेमके काय? तर खेडेगाव तेथील जीवनपद्धती, तेथील खास रितीरिवाज ,शेती निसर्गाशी मातीशी असलेले मानवीपण, तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्ट्ये, मानवी जीवनाला त्यांच्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा, यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्यांनी या ग्रामीण कक्षेत अंतर्भाव केला आहे .

**गृहीतक :**

'२००० नंतरच्या ग्रामीण कथांमध्ये राजकीय, कायदा, धर्म, रूढी, परंपरा, कृषीसंस्कृती, निसर्ग आदि सामाजिक घटकांतून अस्सल ग्राम वास्तव व जाणिवांचे प्रत्ययकारी दर्शन घडते.'

प्रस्तुत शोधनिबंधात २००० नंतरच्या ग्रामीण कथांमधील वास्तव आणि जाणिवा यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणार आहे. १९६०नंतर ग्रामीण साहित्याचा प्रवाह उदयास आला व 'ग्रामीण'या संकल्पनेची बरीच चर्चा झाली. ग्राम,गाव,गावगाडायाविषयी आपले मत मांडताना डॉ. गणेश देशमुख म्हणतात ग्राम या शब्दाचा संबंध प्राचीन व अर्वाचीन काळातील भारतीय संस्कृती व विशेषतः शहरी, कृषी संस्कृतीशी व शेतीशी आहे. प्राचीन भारताचे आद्य वसाहतकर्ते आरंभी पशुपालन व नंतर शेतकरी होते.[१]डॉ. गणेश देशमुख यांनी यथोचित शब्दात प्राचीन संस्कृती व अर्वाचीन काळातील शेती आणि वसाहतकर्ते यांचा निर्देश केलेला दिसून येतो, तो रस्ता आहे असेच म्हणावे लागेल. ग्रामीण साहित्य विशेष करून ग्रामीण वास्तव, तेथील जीवन पद्धती, संस्कृती, रूढी, परंपरा तेथील निसर्ग या सर्व गोष्टींतून आविष्कृत होताना दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात 'ग्रामीण साहित्य' हा शब्द प्रयोग केला जाऊ लागला. ग्रामीण हे विशेषण विशेषत्वाने वापरले जाऊ लागले. एकूणच ग्रामीण संकल्पनेसाठी अनेक संकल्पना त्या काळात वापरल्या गेल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ग्रामीण विकासावर परिणाम झाला, गावाचा आर्थिक कायापालट होऊ लागला. सामाजिक जीवनामध्ये आमूलाग्र बदल होऊ लागले. ग्रामीण समाज शेतीशी निगडित असल्याने नवनवीन अवजारे, बी-बियाणे यांचा वापर ग्रामीण भागातील शेतकरी करू लागला. सहाजिकच कृषिसंस्कृती ही कृषिनिष्ठसंस्कृती असल्याने कृषी संस्कृतीचा प्रभाव ग्रामीण कथांची निर्मिती करणाऱ्या कथाकारांवर पडला. ग्रामीण भागातील लोकांची जीवन जगण्याची पद्धती आणि त्यांच्या सामाजिक जाणिवा अधिक अधिक व्यापक झाल्या. ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी त्यांच्या वागण्या-बोलण्याचा विषय साहित्य म्हणून उदयास येऊ लागला आणि यातूनच विपुल प्रमाणात ग्रामीण



Scanned by CamScanner

कथा साहित्याची निर्मिती झाल्याचे पहावयास मिळते. एकूणच शेती हे महत्त्वाचे सूत्र मानून ग्रामीण साहित्याला चालावे लागते. ग्रामीण जीवनात शेती महत्त्वाची मानली जाते. शेती सोडून जाता येत नाही. उलट तिथेच गाडून घ्यावे लागते. म्हणूनच शेतीशी असणारे त्याचे संबंधीचे भावविश्व ग्रामीण साहित्याचा केंद्रबिंदू होते.[९]ग्रामीण साहित्यातील कथा या प्रकारात सामाजिक वास्तव जीवन व अनेक प्रकारच्या जाणिवा व्यक्त होतात.तसेच अनेक प्रकारच्या मानवी मनाची आंदोलने यांचे आलेख पाहायला मिळतात.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण कथा व २००० नंतरचीकथा यामध्ये बराच कालखंडात गेल्याने यातील आशय, जाणीवा यात बऱ्याच अंशी फरक पहावयास मिळतो. त्याची कारणेही तशीच असल्याचे जाणवते. मग जागतिकीकरणाचा कालखंड असेलकिंवा औद्योगीकरण असेल या सर्वांमुळेआपसूकपणे साहित्य निर्मितीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शेती आणि ग्रामीण जीवनातील ग्राम संस्कृतीचे प्रश्न, समस्या वेगवेगळ्या होत्या. तर २०००नंतर शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्नांचे स्वरूप बदलल्याचे कथासाहित्यातून पहावयास मिळते.२००० नंतरच्या ग्रामीण कथेला एक नवा सामाजिक,सांस्कृतिक संदर्भ आला. या कथा व्यक्तीमनाचे प्रत्यक्ष दर्शन घडविते तसेच ती आपल्या समाजाचे, आपल्या संस्कृतीचे, आपल्या जगण्याचे, आपल्या दारिद्र्याचे आणि एकूणच मानसिक आंदोलनाची प्रतिक्रिया नोंदवीत राहते. त्याची उंची कुठेही कमी होत नाही. म्हणूनच त्या विशिष्ट प्रवाहाचे प्रतिनिधित्व २०००नंतरची कथा करताना दिसून येते.

नव्या औद्योगिकीकरणातील नवनवीन तंत्रज्ञानाला सामोरे जाताना शेतकरी, मजूर, बलुतेदार,नवशेतकऱ्यांचेनवनवीन परिमाण ह्या कथा स्पष्ट करतात. आपल्या कक्षा रुंदावतात. म्हणूनच या ग्रामीण साहित्याच्या तसेच जाणिवांच्या संदर्भात आपले मत मांडताना डॉ. प्रल्हाद लुलेकर म्हणतात, ग्राम हे एकंदर भारतीय आदिपीठ आहे त्या संस्कृतीच्या व्यक्तिमत्त्वाचे अनन्यसाधारण, सर्वसाधारण, सर्वसमावेशक रूप आहे. हे लोकसमूहातून निर्माण झालेल्या संकेत, रूढी-परंपरा यांनी बद्ध झालेले आहे. तेथील रीती, संस्कृती यामुळे जीवन घडले. त्याचबरोबर नव्या जाणिवांना नवे उन्मेष फुटले.[१]सर्वसामान्य जीवन जगत असताना ग्रामीण भागातील माणसाच्या वाट्याला आलेले जीवन, त्याचे भावविश्व, नव्या जाणिवा आहे हेच कथा साहित्याचे विषय झाले. त्यातून ग्रामीण कथेने वेगळे रूप धारण केल्याचे निदर्शनास येते. ग्रामीण भागातील मानवी जीवनाचे चित्रण करत असताना माणसाचे शेतीशी असणारे नाते उलगडत जाते आणि मग नकळतपणे निसर्गाचे, शेतीचे,पशुपक्षी आणि पिकांचे, धनधान्याचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष चित्रण कथेत करावे लागते.ही एकच भूमिका महत्त्वाची ठरते. शेतीला प्रमाण म्हणून ग्रामीण कथा आकार घेत असतात. म्हणूनचयाविषयी ग्रामीण साहित्याचे अभ्यासक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, शेती केंद्रस्थानी असल्यामुळे ग्रामजीवनातील विविध घटक आणि विविध स्तर परस्परपूरक अशा भूमिका वठवीत असणार हे उघड आहे. त्यामुळे ते कृषिकेंद्रित आणि स्वतंत्र संस्कृती निर्माण होऊ शकते. कृषी जीवनाशी निगडित सण-उत्सव साजरे केले जातात. पोळा, दसरा, अक्षयतृतीया, गुढीपाडवा या सगळ्या सणांना शेती संस्कृतीत महत्त्व आहे.[?] ग्रामीण भागातील माणसाच्या एकंदर जडणघडणीमध्ये शेतीचा वाटा खूप महत्त्वाचा आहे. कृषिप्रधानता, निसर्ग आणि शेतीवर अवलंबून असणारी मानसिकता यामुळे कृषिसंस्कृती आपले अस्तित्व आजही कायम टिकवून आहे. लोकराज्यात लोककल्याणकारी योजना यशस्वी



Scanned by CamScanner

झाली. एकूणच शेतकऱ्यांच्या वाट्याला अपयश, निराशा, आत्महत्या गर्व आले तर आधुनिकतेच्या व औद्योगीकरणाच्या अनेक नव्या परिघामध्ये ग्रामीण माणूस होरपळूननिघेल.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक ग्रामीण कथाकारांनी ग्रामीण जीवनाचे नेमके यथार्थ चित्रण केल्याचे पहावयास मिळते. त्यांनी ग्रामीण कथेला लोकप्रियता मिळवून दिली. त्यामध्ये श्री.म.माटे असतील, ग्रामीण कथेला निराळे परिमाण प्राप्त करून देण्याचे काम शंकर पाटील, द.मा मिरासदार, अण्णाभाऊ साठे, उद्धव शेळके, ग.दि माडगूळकर, शंकरराव खरात, आनंद यादव, द.ताभोसले, मनोहर तल्हार इ. दुसऱ्या पिढीतील कथाकारांनी केले. या सर्वांनी विविध परिसराची निवड करून भिन्नभिन्न स्वरूपामध्ये ग्रामीण कथा रुजत असतानाच ग्रामीण परिसराचे अंतरंग उलगडून दाखविण्याचे कार्य केले. तसेच तेथील व्यथा, वेदना, दुःख यांना वाचा फोडण्याचे काम, तेथील विरोध विसंगतीचे दर्शन या ग्रामीण कथाकारांनीमोठ्याप्रमाणावर घडविले आहे. परंतु २००० नंतरच्या ग्रामीण कथांमध्ये वास्तवाची भिस्त खंबीरपणे पेलणारे सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, अशोक कोळी, श्रीकांत देशमुख, सचिन पाटील, उमेश मोहिते, कृष्णा खोत, कैलास दौंड, अंकुश गाजरे, हिंमत पाटील,आदिकथाकारांनी ग्रामीण जीवनातील दुःख, दारिद्र्य, विसंगती, राजकारण यांच्यावर विनोदनिर्मिती यासह एकूणच कथानकांमध्ये रंगत भरलेली आहे, असे आपणास जाणवते. राजकीय आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्याने ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून गेलेला आहे. याचा फायदा या२००० नंतरच्या ग्रामीण कथाकारांनी घेतलेला दिसतो. या कथाकारांनी एकूणच आजूबाजूचा परिसराविषयी जागरूक राहून लेखन केले.२००० नंतरच्या ग्रामीण कथांमध्ये शिक्षणाचे बाजारीकरण, हुंडाबळी, नरबळी, सांस्कृतिक प्रदूषण, नीतिमूल्यांचा ऱ्हास, मानसिक भयग्रस्तता,व्यवसायातील जीवघेणी स्पर्धा, यांत्रिकीकरणाचे, दुष्काळाचे भीषण चित्रण, रासायनिक खते.पिकांवरील विविध रोग. लागून पडणारी औषधांची मात्रा यातून होणारी शेतकऱ्याची हतबलता, स्त्रियांच्याजाचाचे अनेक प्रकार ग्रामीण कथेचे विषय होऊन आपल्याला समोर येत राहतात.२००० नंतरच्या ग्रामीण कथा लिहिणारे लेखक म्हणजे ग्रामीण भागातून शिकून-सवरून आलेले नवतरुण होते. त्याचबरोबर आपल्या परिसरातील जीवनानुभव घेऊन नव्या दमाचे तरुणपिढीतील लेखक दिसून येतात. ग्रामीण भागातील वेगवेगळ्या अनुभवांची समृद्धता त्यांच्या कथेतून येताना दिसते.



Scanned by CamScanner

२००० नंतरच्या ग्रामीण कथेचा विचार करण्यापूर्वी बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक ठरेल . जागतिकीकरणानंतर महाराष्ट्रातील परिस्थिती भिन्न भिन्न गोष्टींशी संबधित आहे . ग्रामीण पातळीवरील बदलने राजकारण व समाजकारण , शिक्षणातून दृष्टी प्राप्त झाल्याने शहरी जीवनाचे वाढलेले आकर्षण , बदलत्या कुटुंब व्यवस्थेमुळे विभक्त कुटुंब पद्धतीचा वाढत गेलेला विस्तार , स्वार्थी आणि आपमतलवी वृत्तीतून तयार झालेले मुल्यहीन राजकारण व त्यातील तरुणांचा सहभाग , निसर्गाच्या अवकृपेने शेतीविषयीची ओढ असून गालेलठ्ठ पगाराच्या नोकरीसाठी केलेले प्रयत्न , शेत - जमिनीच्या वाटण्यांमुळे कुटुंबाचे घसरत गेले दरडोई उत्पन्न , कर्जबाजारीपणामुळे होऊ लागलेल्या शेतकरी आत्महत्या या सगळ्या प्रश्नांना घेऊन येणा-या कथासंग्रहातील निवडक कथा येथे नमुद कराव्याशा वाटतात . त्यामध्ये सर्वप्रथम सचिन वसंत पाटील यांचा 'सांगावा' या कथासंग्रहाचा नामोल्लेख करणे गरजेचे वाटते . या कथासंग्रहाच्या शीर्षकावरुन लक्षात येते की , शेतक-यांशी निगडीत हा कथासंग्रह आहे . काळजाचा ठाव घेणा-या एकापेक्षा एक सरस कथा सचिन पाटील यांनी 'सांगावा' मध्ये यथार्थपणे मांडलेल्या आहे . बारीक - सारीक तपशीलाच्या खोलात जाऊन मर्मभेदक वास्तवाची जाणीव ते आपल्या कथांमधून देतात . एकूणच त्यांच्या कथेला ग्रामीण मातीचा गंध आहे . कृष्णेच्या पाण्याचा खळाळ आहे .

यानंतर सदानंद देशमुख यांच्या २००८ मध्ये प्रकाशित झालेल्या ' खुंदळघास ' तथा २०१२ मधील ' गाभुळगाभा ' यातुन ग्रामीण व्यवस्थेत सामाजिक , राजकीय , आर्थिक , धार्मिक अंगाने झालेल्या परिवर्तनामुळे या महत्त्वपूर्ण कथासंग्रहाचा उल्लेख करणे गरजेचे वाटते . युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त आसाराम लोमटे यांचा २००६ साली प्रकाशित झालेला 'इडा-पिडा टळो' , अशोक कोळी यांचा 'आमुड' , श्रीकांत देशमुख यांचा 'पडझड वाड्याच्या भिंती' , उमेश मोहिते याचा 'मुकं जनावर' (२०१७) , कृष्णा खोत यांचा 'बोअरवेल' (२०१७) , कैलास दोंड यांचा 'एका सुगीची अखेर' (२००९), अंकुश गाजरे यांचा 'गावमातीतील माणसं' (२०१६) अशा ग्रामीण कथा लेखकांनी विविध प्रकारचे ग्रामजीवनाचे केलेले वर्णन, गंभीर शीर्षक वाचकांना नक्कीच अंतर्मुख करतात . कथांचे विषय , पात्रयोजना , संवाद आणि अनेक कथांचा आशावादी शेवट ही या एकूणच सर्व



Scanned by CamScanner

कथासंग्रहांची वैशिष्ट्ये आहे . सर्व कथांमधून आलेली प्रसंग वर्णने ही बोलीभाषेतून असल्याने ती आपलीशी वाटतात . त्यामुळे वाचकांच्या डोळ्यासमोर हुबेहुब प्रसंग उभा करताना जवळजवळ सर्वच कथाकार यशस्वी होतात . बदलत्या शेती व्यवस्थेत पारंपारिक शेतकरी हतबल झालेला पाहायला मिळतो . नवीन तंत्रज्ञान वापरून नवे काही करण्यासाठी धडपडत असणारा तरुण शेतकरी आज व्यवस्थेच्या चक्रात कसा अडकून पडला आहे . याचेही चित्रण आपल्याला दिसते . तसेच काही कथांमधून जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे , ग्रामीण जीवनात बदल घडवून आणून शहरी जीवनाचे अनुकरण करणारे , जमीन विकून मुलींची लग्न आणि मुलांच्या नोकरीसाठी डोनेशन देणारे शेतकरी पालकही या कथामधून आपल्याला भेटतात . शहरालगतच्या खेड्यातील बिल्डरांनी गिळंकृत केलेल्या शेतजमिनी आणि त्यावर उभी राहिलेली अपार्टमेंटनी 'रो-हाऊसेस' ची संस्कृती , शहरालगतच्या ढाबा संस्कृतीशी स्वतःला जुळवून घेतलेले ग्रामीण युवक , गलिच्छ राजकारणाविषयी फारसा विचार न करता राजकीय पुढा-यांमागे फिरणारे तरुण , अॅडमिशन घेऊन नंतर परीक्षेलाच येणारे तरुण विद्यार्थी , मूल्यांची पडझड झालेली शिक्षण व्यवस्था , समूह भावनेपेक्षाही स्वतःपुरताच विचार करण्याची लागलेली सवय , शेतीपेक्षा नोकरीच बरी अशी बदलत गेलेली मनोवृत्ती , शेतकरी नव-यापेक्षा नोकरदार नवरा हवा म्हणणा-या युवती , खेड्याच्या दिशेने वाटचाल करणारी पिझ्झा-बर्गरची संस्कृती , नगदी पिकांच्या हव्यासापायी आटत चाललेले भूजल साठे, वातावरणातील बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे होणारी पावसाची अनिश्चिती असे अनेक प्रश्न हे ग्रामीण भागातील सामाजिक वास्तवावर थोड्याफार प्रमाणात प्रकाश टाकतात. हे आपल्याला वरील सर्व कथासंग्रहातून पहावयास मिळते.

वरील सर्व बाबी बदलत्या काळाच्या निदर्शक आहेत. सामाजिक स्थित्यंतराचे पडसाद त्यातून लक्षात येतात . यातून बदलते जीवनवास्तव प्रत्ययास येत असले तरी, माणूस म्हणून असणा-या संवेदना मात्र तितक्या सहजतेने बदलत नाहीत. 'ग्रामीण' ही नुसती संज्ञा नाही . ती साहित्यातून कलात्मक रूप घेऊन अवतरते तेव्हा एक विशिष्ट जाणिवेचा स्पर्श तिला झालेला दिसतो. एकूणच यासर्व कथामधून चिंतनपर तथा प्रगल्भतेने व तेवढ्याच ताकदीने अनेक पदरी ग्रामवास्तव चित्रित झाल्याचे दिसते. माणूस म्हणून असणा-या संवेदना आणि बोथट होत गेलेल्या संवेदना यांच्या संघर्षातून तो स्वतःलाच मांडत जातो. कोणत्याही साहित्यकृतीतून वास्तव जसेच्या तसे उतरत नाही, त्याला कलात्मक अभिव्यक्तीचे रूप प्राप्त होते, काळीज पोखरणा-या घटनांना शब्दबद्ध करीत जाणे हीच भूमिका प्रधान ठरते व त्यातून समान असूनही अभिव्यक्तीचे वेगळेपण साहित्यकृतीला मिळत जाते.



Scanned by CamScanner

कथासंग्रहांची वैशिष्ट्ये आहे . सर्व कथांमधून आलेली प्रसंग वर्णने ही बोलीभाषेतून असल्याने ती आपलीशी वाटतात . त्यामुळे वाचकांच्या डोळ्यासमोर हुबेहुब प्रसंग उभा करताना जवळजवळ सर्वच कथाकार यशस्वी होतात . बदललेल्या शेती व्यवस्थेत पारंपारिक शेतकरी हतबल झालेला पाहायला मिळतो . नवीन तंत्रज्ञान वापरुन नवे काही करण्यासाठी धडपडत असणारा तरुण शेतकरी आज व्यवस्थेच्या चक्रात कसा अडकून पडला आहे . याचेही चित्रण आपल्याला दिसते . तसेच काही कथांमधून जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे , ग्रामीण जीवनात बदल घडवून आणूत शहरी जीवनाचे अनुकरण करणारे , जमीन विकून मुलींची लग्न आणि मुलांच्या नोकरीसाठी डोनेशन देणारे शेतकरी पालकही या कथांमधून आपल्याला भेटतात . शहरालगतच्या खेड्यातील बिल्डरांनी गिळंकृत केलेल्या शेतजमिनी आणि त्यावर उभी राहिलेली अपार्टमेंटची 'रो-हाऊसेस' ची संस्कृती , शहरालगतच्या ढाबा संस्कृतीशी स्वतःला जुळवून घेतलेले ग्रामीण युवक , गलिच्छ राजकारणाविषयी फारसा विचार न करता राजकीय पुढा-यांमागे फिरणारे तरुण , अॅडमिशन घेऊन नंतर परीक्षेलाच येणारे तरुण विद्यार्थी , मूल्यांची पडझड झालेली शिक्षण व्यवस्था , समूह भावनेपेक्षाही स्वतःपुरताच विचार करण्याची लागलेली सवय , शेतीपेक्षा नोकरीच बरी अशी बदलत गेलेली मनोवृत्ती , शेतकरी नव-यापेक्षा नोकरदार नवरा हवा म्हणणा-या युवती , खेड्याच्या दिशेने वाटचाल करणारी पिझ्झा-बर्गरची संस्कृती , नगदी पिकांच्या हव्यासापायी आटत चालेले भूजल साठे, वातावरणातील बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे होणारी पावसाची अनिश्चिती असे अनेक प्रश्न हे ग्रामीण भागातील सामाजिक वास्तवावर थोड्याफार प्रमाणात प्रकाश टाकतात. हे आपल्याला वरील सर्व कथासंग्रहातून पहावयास मिळते.

**संदर्भसूची :**

१) गणेश देशमुख : "ग्रामीण समाजजीवन व साहित्य" स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. ५ सप्टेंबर २००८ पृ.क्र.२४७

२) प्रल्हाद लुलेकर : "प्रतिभेचे दर्शन" कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. जानेवारी २००० पृ.क्र.२५

३) तत्रैव पृ.क्र.२

४) नागनाथ कोत्तापल्ले : "ग्रामीण साहित्य स्वरूप व बोध" स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती तिसरी जानेवारी २००६ पृ.क्र.१२



Scanned by CamScanner